# <u>मूक प्रेम गीत</u>

हवेवर नाव लिहायचे लिहून ते पुसायचे
प्रेम असे करावे, ज्यांचे त्यांनाच कळावे..

जागता स्वप्न पाहायचे, स्वप्नात पूर्ण करायचे
पंखा शिवाय उडायचे, भूस्पर्शी नभ चुंबायचे ..

भेटीचे स्वप्न मोठे, भेटून न करावे छोटे
शब्दांशिवाय बोलायचे,आणाभाका निभावायचे..

येवू दे माझ्या वाटे, असे जीवाला वाटे
वाटेत ना चुकायचे, सतत सोबत चालायचे...